Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई
बालभारती शेजारी, आगारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel: Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./गणकयंत्र/१६०/४९१०

दिनांक : १८.११.२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय : इ. १२ वी फेब्रु.-मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या शाळा, आदिवासी आश्रमशाळा, रात्र शाळा, सैनिकी शाळा, नवोदय विद्यालय व विद्यानिकेतन शाळांची यादी पाठविणे व आवेदनपत्र भरण्याच्या कार्यपद्धतीबाबत.

संदर्भ : शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. शिसं/उमा/विद्याशाखा/११ वीऑप्रप्र/अ-१/२०२६-२७/, दि. १६/११/२०२६.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, समाजकल्याण विभागाच्या शाळा, आदिवासी आश्रमशाळा, रात्र शाळा, सैनिकी शाळा, नवोदय विद्यालय तसेच विद्यानिकेतन शाळा या संस्था सन २०२४-२५ च्या इ. ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत (FYJC) समाविष्ट नव्हत्या. त्यामुळे या शाळांमध्ये इ. ११ वी मध्ये ऑफलाइन पद्धतीने प्रवेशित असलेल्या नियमित विद्यार्थ्यांचे सन २०२६-२७ च्या इ. १२ वी परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याचे निर्देश शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त झाले आहेत.

सदर पात्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागीय मंडळांनी खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी:

१. पात्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची यादी सादर करणे :

आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व समाजकल्याण विभागाच्या शाळा, आदिवासी आश्रमशाळा, रात्र शाळा, सैनिकी शाळा, नवोदय विद्यालय व विद्यानिकेतन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची एकत्रित यादी (College Index No. सह) राज्य मंडळाच्या गणकयंत्र (EDP) विभागास तातडीने ईमेलद्वारे पाठवावी.

२. डेटा अपलोड करण्याची प्रक्रिया :

विभागीय मंडळांकडून प्राप्त यादीतील कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा डेटा राज्य मंडळाच्या गणकयंत्र विभागामार्फत सरल (SARAL) पोर्टलवरून डाउनलोड करून व FYJC फॉरमॅटमध्ये रूपांतरित करून ऑनलाइन आवेदनपत्र भरण्याच्या प्रणालीवर अपलोड केला जाईल.

३. शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना द्यावयाच्या सूचना (आवेदनपत्र भरण्याची कार्यपद्धती) :

डेटा अपलोड झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी इ. १२ वी फेब्रु.-मार्च २०२७ परीक्षेची आवेदनपत्रे भरताना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी, याबाबत आपल्या स्तरावरून सर्व पात्र शाळांना अवगत करावे:

Session ID मध्ये 'FEB/MAIN EXAM' निवडावे.
Year मध्ये '2025' निवडावे.

Scanned with OKEN Scanner

Seat No. च्या ठिकाणी विद्यार्थ्याचा PEN ID प्रविष्ट करावा.

सदर माहिती भरल्यानंतर अपलोड केलेला विद्यार्थ्याचा डेटा स्क्रीनवर दिसून येईल (Pop-up होईल) व त्याआधारे नियमित पद्धतीने परीक्षा आवेदनपत्र भरता येईल.

उपरोक्त प्रमाणे सर्व विभागीय मंडळांनी त्यांच्या कार्यकक्षेतील पात्र संस्थांची यादी तात्काळ राज्य मंडळास पाठवावी व संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना या कार्यपद्धतीबाबत आपल्या स्तरावरून अवगत करावे.

(मा. अध्यक्ष राज्यमंडळ यांचे मान्यतेने)

(डॉ. दिपक माळी)
(सचिव)
राज्य मंडळ, पुणे – ४११ ००४.

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा 4341
दिनांक - 19/11/2026

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय - इ.12 वी फेब्रु-मार्च 2027 परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी समाजकल्याण विभागाच्या शाळा, आदिवासी आश्रमशाळा, रात्र शाळा, सैनिकी शाळा, नवोदय विद्यालय व विद्यानिकेतन शाळांची यादी पाठविणे व आवेदनपत्र भरण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) फेब्रु-मार्च 2027 परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरताना उपरोक्त प्रकटनातील सुचनांची कटाक्षाने नोंद घेऊन सादर करावयाची असुन याबाबत उचित कार्यवाही करावी.

(गजानन उकिर्डे),
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner